कचेरी - प्रत

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम्"

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

स्थापना १९४४

ज्योतिर्विद्या परिसंस्था पुणें

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९६७–६८ * वर्ष २४ वे

## वार्षिक-वृत्तान्त व समाव्यय

( पुढील वर्षाच्या निकल्पासह )

[ वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण—मलपृष्ठ २ पाहावें ]

प्रकाशक

मो. ना. गोखले, B. Sc.

वि. वि. मोडक, G. D. C., G. C. C.

कार्यवाह

## वार्षिक निकायसभेचें निमंत्रण

चालू २५ व्या वर्षाची **निकायसभा** ( General Body Meeting ) **रविवार ता. १७ नोव्हेंबर १९६८** ला सकाळीं ९ वाजतां **लो. टिळक स्मारक मंदिराचे** सभागृहांत भरेल. त्यावेळीं पुढील क्रमणिकेंत दिलेलें कामकाज होईल, तरी सर्व सदःस्थांनीं सभेस अवश्य उपस्थित रहावें ही विनंती.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.
( २ ) गतवर्षाच्या ( १८६७–६८ ) निकायसभेच्या इतिवृत्तास मान्यता.
( ३ ) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधानें गतवर्षांतील कार्याचें निवेदन.
( ४ ) गतवर्षाच्या समाव्यवास मान्यता.
( ५ ) नवीन वर्षाकरितां ( १९६८–६९ ) पदाधिकाऱ्यांची निवड.
( ६ ) १९६८–६९ मध्यें संस्थेनें हातीं घ्यावयाचीं कामें.
( ७ ) १९६८–६९ च्या निकल्पावर चर्चा.
( ८ ) आयत्या वेळचे विषय ( अध्यक्षांच्या अनुमतीनें ).
( ९ ) प्राध्यक्षांचें भाषण.
( १० ) आभार.

आपले

**मो. ना. गोखले**

पुणे, ३ नोव्हेंबर १९६८ **वि. वि. मोडक**

कार्यवाह

**टीप**—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें.

ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।

( स्थापना : गणेशचतुर्थी, शके १८६६, ता. २२–८–१९४४ )

## सन १९६७–६८ चा ( २४ व्या वर्षाचा ) वृत्तान्त

**प्रिय सदःस्थ व संस्थेचे हितचिंतक,**

ता. ३० जून १९६८ ला संपणाऱ्या, संस्थेच्या २४ व्या वर्षाचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आवश्यक त्या पत्रकांसह आपणांपुढें सादर करण्यास आम्हास आनंद होत आहे. सतत प्रगतिपथावर असणाऱ्या आपल्या संस्थेनें आतां २४ व्या वर्षांत पदार्पण केलें आहे.

### वृत्तान्तवर्षांतील पदाधिकारी

गतवर्षारंभीच्या निकायसभेनें [ General body नें ] १९६७–६८ साठीं **प्रशासक मंडळावर** व **तद्विद्य मंडळावर** पुढील सन्मान्य सदःस्थांची निवड केली होती.

**प्रशासक मंडळ** [ Governing Council ]

**प्राध्यक्ष :** प्रा. डी. डी. कापडिआ, एम्. ए., बी. एस्सी., आय. ई. एस. ( सेवानिवृत्त )

**अध्यक्ष :** प्रि. गो. रा. परांजपे, एम्. एस्सी., एफ. एन्. आय., ओ. बी. ई. ( सेवानिवृत्त )

**उपाध्यक्ष :** प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर एम्. एस्सी., डी. एस्सी.; वास्तव विभाग प्रमुख, पुणें विद्यापीठ.

**नैधिक** :—प्रा. स. वि. आपटे, एम्. ए., बी. एस्सी., बी. ई. एस्. (सेवानिवृत्त)

**कार्यवाह** :—( १ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.
( २ ) श्री. वि. वि. मोडक, जी. डी. सी., जी. सी. सी.

**सदःस्थ** :—( १ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, एम्. ए., बी. ई. एस्. (सेवानिवृत्त)
( २ ) श्री. द. गो. फडके, बी. ए., एल्. एल्. बी.
( ३ ) श्री. वि. घों. गोरेशास्त्री.
( ४ ) प्रा. ना. म. आठवले, एम्. ए.
( ५ ) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.
( ६ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी., बी. टी.
( ७ ) श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी. असिस्टंट मीटिऑरॉलॉजिस्ट.
( ८ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( ९ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.
(१०) श्री. श्री. शं. पतके, एम्. ए.
(११) श्री. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.

**अधीक्षक** :—( अन्तर्गत समाव्यय-निरीक्षक )

श्री. श्रीपाद गोविंद फणसळकर, बी. ए.

**तद्विद्य मंडळ**—( Academic Council )

( १ ) प्रि. गो. रा. परांजपे
( २ ) प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर
( ३ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय
( ४ ) प्रा. स. वि. आपटे
( ५ ) प्रा. ना. म. आठवले
( ६ ) प्रा. द. श्री. जोग
( ७ ) प्रा. ज. ब. कुमठेकर
( ८ ) श्री. मा. भ. पंत ( निमंत्रक )



# वृत्तान्त वर्षांतील परिसंस्थेच्या कार्याचें इतिवृत्त

## वृत्तान्त वर्षांतील सभा

### प्रशासक मंडळाच्या सभा

दि. १० – ९ – ६७ ला झालेल्या सभेंत, १९६६–६७ च्या इतिवृत्तांच्या खर्ड्यांस व १९६७–६८ च्या निकल्पास मान्यता देण्यांत आली. वार्षिक निकाय सभा २–१०–६७ ला घ्यावी असें ठरलें. दि. १७–५–६८ ला झालेल्या सभेंत आगामी **अवकाशविज्ञान व्याख्यानमाला** आणि त्याप्रसंगीं भरविलें जाणारें **अवकाशविज्ञान** विषयक प्रदर्शन या संबंधी विचार झाला. अशा प्रकारचा उपक्रम पुण्यातच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांत प्रथमच होणार असल्यामुळें त्याचें शैक्षणिक महत्त्व ओळखून त्या कार्यक्रमासाठीं आर्थिक झीज सोसावी लागली तरीही संस्थेनें ही व्याख्यानमाला व प्रदर्शन घडवून आणावेंच असें सर्वानुमतें ठरलें. यासंबंधांत श्री. वि. वि. मोडक यांनीं पुढील ठराव मांडलाः—

'अवकाशविज्ञान व्याख्यान माला उपसमितीनें शिफारस केलेल्या रु. २५०० च्या खर्चास खालीलप्रमाणें मान्यता देण्यांत येत आहे. रु. ११००।–चालू खर्चांत इतर बाबींवर काटकसर करून आणि जास्तीत जास्त रु. १४००।–कायम निधींतून उचल करून घ्यावे.' ( हा खर्च सुमारे ३ वर्षांत भरून काढावा. )

### तद्विद्य मंडळाच्या सभा

दि. १३–८–६७ ला झालेल्या सभेंत, प्रा. नानासाहेब आठवले यांनीं सुधारून स्वतः तयार केलेल्या ॲस्ट्रोग्लोबसंबंधीं माहिती सांगितली. त्याच्या जुळणीचें प्रात्यक्षिक श्री. रवींद्र नेने आणि श्री. सनत्कुमार मराठे यांनीं करून दाखविलें. हा ॲस्ट्रोग्लोब, प्रा. आठवले यांनी ह्या परिसंस्थेस भेट म्हणून दिला.

### अवकाशविज्ञान व्याख्यानमाला उपसमितीची सभा

दि. ७–५–६८ ला झालेल्या सभेंत, मालेसाठीं सभागृह, प्रदर्शनासाठीं जागा, प्रदर्शनांत ठेवावयाचीं मूर्तकें आणि व्याख्यानमालेचें वेळापत्रक यासंबंधी विचार झाला. सभागृह मिळण्यांतील अडचणी, व्याख्यात्यांची सोय या दृष्टीनें मालेची सुरुवात जूनच्या तिसऱ्या आठवड्यात न होता, जुलैच्या पहिल्या आठवड्यात झाली तरी चालेल, मात्र त्यापुढें सुरुवात लांबवू नये असें सर्वानुमतें ठरलें.

### भूगोल खगोल निदर्शनें

● दि. १४–१०–६७ ला, **इन्डिअन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पवई** येथील **ॲस्ट्रॉनामी क्लबच्या** सुमारे १२ सभासदांनीं सायंकाळीं ७॥ वाजतां

परिसंस्थेस भेट दिली. त्यावेळीं कार्यवाह **श्री. गोखले** यांनीं पाहुण्यांना संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

● दि. २९–१०–६७ ला पहाटे, दूरदर्शातून शुक्राची कोर दाखविण्याचा कार्यक्रम, पूर्वप्रसिद्धी देऊन करण्यांत आला.

● दि. ७–१२–६७ ला, रात्री, कॅम्प एज्युकेशन सोसायटी पुणें, या संस्थेच्या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसाठीं आकाशदर्शन आणि ज्योतिष्यकीय माहिती देणारें व्याख्यान असा जोड कार्यक्रम परिसंस्थेनें केला.

● जानेवारी ६८ च्या पहिल्या आठवड्यांत, ज्येष्ठा नक्षत्राच्या उत्तरेस-जपानी हौशी ज्योतिर्विद इकेया सेकी यांनीं शोधलेला **इकेया सेकी—२** ह्या धूमकेतूचा शोध करण्यासाठीं परिसंस्थेनें प्रयत्न केला.

आकाशनिदर्शनाच्या सर्व कार्यक्रमास, श्री. स. ग. काजरेकर, श्री. स. चि. मराठे, श्री. य. रा. नेने, श्री. नावलेकर, श्री. वि. वि. मोडक आणि श्री. मो. ना. गोखले यांचें साह्य लाभलेलें होतें.

### प्रा. ना. म. आठवले यांच्या यंत्रशाळेस भेट

दि. २६–११–६७ ला सकाळीं ८॥ ते १०॥ या वेळेत, परिसंस्थेच्या अभ्यास मंडळानें प्रा. ना. म. आठवले यांच्या प्रकाशीय उपकरण निर्मितीच्या यंत्रशाळेस भेट दिली. त्यावेळीं **प्रा. आठवले** यांनीं सर्व सभासदांना, त्यांनीं स्वतः तयार केलेला **कॅसिग्रेन टाईप** दूरदर्शी दाखविला आणि त्यासंबंधीं माहिती दिली.

### मराठी विज्ञान परिषदेशीं सहकार्य

परिषदेच्या पुणे येथील दुसऱ्या अधिवेशनाचे वेळीं, दि. ३ ते ५ डिसेंबर ६७ या काळांत भरविलेल्या विज्ञानविषयक प्रदर्शनात परिसंस्थेनें भाग घेतला होता. ज्योतिष्यकीय निबंधने दाखविणारे मूर्तक आणि ताराचित्रकाचा परिभादर्श तेथें ठेविले होते. माहिती देण्यासाठीं स्वयंसेवकांची तत्पर योजना केलेली होती. त्याचवेळीं मराठी विज्ञान परिषदेनें भरविलेल्या विज्ञान ग्रंथांच्या प्रदर्शनात, परिसंस्थेचीं सर्व प्रकाशनेंही ठेवण्यात आलीं होतीं. परिषदच्या वतीनें या प्रसंगी प्रकाशित केल्या गेलेल्या **स्मरणिकेंत** परिसंस्थेच्या कार्याची माहितीही प्रसिद्ध केली गेली.

### व्याख्यानें

परिसंस्थेच्या वतीनें या वर्षी पुढील माहितीपूर्ण व्याख्यान घडवून आणलें गेलें.

शनिवार दि. १७–२–६८ ला सायंकाळीं ६ वाजतां **सर परशुरामभाऊ** कॉलेजच्या वास्तव विभागाच्या सभागृहांत **प्रा. डॉ. मो. वा. चिपळूणकर** यांचें **राक्षसी दुर्बिणी—एक आव्हान** या विषयावर व्याख्यान झालें.



अन्य संस्थांच्या निमंत्रणांवरून, परिसंस्थेच्या सभासदांनीं, विज्ञानविषयक पुढील व्याख्यानें दिलीं.

| | व्याख्याते | विषय | दिनांक | निमंत्रक संस्था |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री.मो.ना.गोखले | वास्तवशास्त्राचा विकास | २७-८-६७ | महा०औद्यो०संग्रहालय |
| (२) | ,, ,, ,, ,, | ,, –(२) | ३-९-६७ | ,, |
| (३) | ,, ,, ,, ,, | ,, –(३) | १०-९-६७ | ,, |
| (४) | डॉ.मो.वा.चिपळूणकर | आयनावरण | ३-१०-६७ | ,, |
| (५) | प्रि. गो. रा. परांजपे | विज्ञान साहित्य निर्मितीच्या मार्गांतील विघ्नें | ३१–३–६८ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई. |
| (६) | प्रा. द. वि. बडवे | न्यूटन ते नारळीकर | १०–५–६८ | वसंत व्याख्यानमाला, पुणें |
| (७) | ,, | विज्ञानातील मूलक | २७–५–६८ | महा. औद्यो. संग्रहालय |
| (८) | श्री. मो. ना. गोखले | किंतारे (क्वासार्स) | १९–५–६८ | ,, |

### अभ्यास मंडळ

दर रविवारीं, दुपारीं ३॥ ते ६॥ पर्यंत संस्थेच्या कार्यालयांत अभ्यास मंडळ भरत असे. या बैठकांमध्यें सामान्य ज्योतिःशास्त्र, ज्योतिर्वास्तव, अवकाशविज्ञान,इत्यादि विषयांवरील प्रचलित संशोधनासंबंधींच्या लेखांचें वाचन व चर्चा होत असे. अभ्यास–मंडळाच्या कार्यक्रमास, प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, श्री. पंत, श्री. य. रा. नेने, श्री. र.म. नेने, श्री. मराठे, श्री. मोडक, श्री. नावलेकर, श्री. प्रभुदेसाई, श्री. गो. ह. जोग, श्री. दि. द. बर्वे, श्री. काजरेकर, प्रा. का. द. बोकील व श्री. गोखले ही मंडळी उपस्थित असत.

### संस्थेस मिळालेल्या देणग्या आणि अनुदान

(१) श्री. अजित त्र्यंबक ढवळे, M. Sc., यांनीं आपल्या तीर्थरूपांचे स्मरणार्थ रु. २५ ची देणगी दिली.

(२) महाराष्ट्र शासनाकडून यावर्षी परिसंस्थेस एकूण रु. २८४ चें अनुदान मिळालें.

( ३ ) पुणें महानगरपालिकेकडून या वर्षी एकूण रु. ५०० चें अनुदान मिळालें.

( ४ ) मराठी विज्ञान परिषदेच्या पुणे शाखेकडून आगामी अवकाश विज्ञान व्याख्यान मालेसाठीं रु. २५० चें अनुदान मिळालें.

( ५ ) **ज्युबिली फंडासाठीं,** यावर्षी रु. ९८।– च्या देणग्या मिळवून या फंडाची सुरवात केली आहे.

**संस्थेचे सद:स्थ:–** संस्थेच्या पटावर आज आजीव सद:स्थ २४, सामान्य सद:स्थ १५४ याप्रमाणें सद:स्थ संख्या आहे.

**ग्रंथसंग्रहांत पडलेली भर–**

( 1 ) Physics of the Inquiring Mind–Rogers.
( 2 ) Captives of The Sun ... J. S. Pickering
( 3 ) Interstellar Communication : The seareh for life... A. G. W. Cameron
( 4 ) Atlas of the Universe ... D. R. Welsh
( 5 ) Galaxies, Nuclei & Quasars..Fred Hoyle.
( ६ ) चंद्राकडे वाटचाल.......दिलीप बर्वे

**प्रा. मो. ल. चंद्रात्रेय** यांनी आपल्या संग्रहांतील गणित व ज्योतिःशास्त्राची सुमारें ५० पुस्तकें या वर्षी संस्थेस दिलीं आहे.

प्रतिवर्षाप्रमाणें याहि वर्षी सृष्टिज्ञान व एन्डेव्हर हीं मासिकें संस्थेस भेट म्हणून मिळालीं.

**नवसद:स्थांचें स्वागत**

वृत्तान्तवर्षी पुढील सद्‌गृहस्थांना परिसंस्थेचें सद:स्थत्व देण्यात आलें.

१ ) डॉ. वा. द. वर्तक, M. Sc. Ph. D.
२ ) श्री. प्रभाकर दत्तात्रेय इनामदार, B. Sc. M. Ed.
३ ) श्री. बल्लाळ गंगाधर बापट, B. Sc. ( Hons. )
४ ) श्री. रत्नाकर विश्वनाथ रास्ते.
५ ) प्रा. काशिनाथ दत्तात्रेय बोकील, B. A. ( Hons. ) LL. B., B.T.
६ ) श्री. त्र्यंबक गंगाधर रत्नपारखी, B. E.
७ ) श्री. नागनाथ राजन्ना वडनप, B. Sc. ( Hons. )

**चिरवियोग**

परिसंस्थेचे एक हितचिंतक, सद:स्थ आणि वैदिक ज्योतिष्यकाचे संशोधक **श्री. आर. के. प्रभु** हे निवर्तल्याचे समजले हे नमूद करण्यास आम्हास दुःख होतें.



**आभार :**

परिसंस्थेच्या २४ व्या वर्षाचा अहवाल आपणापुढें ठेविला आहे. त्यावरून संस्थेची प्रगति आपल्या नजरेस येईल. परिसंस्थेच्या कार्यवाढीस सर्व सदस्यांचें व विज्ञानप्रेमी जनतेचें आम्हांस सर्वतोपरी साह्य झालेलें आहे.

संस्थेचे अन्तर्गत अधीक्षक श्री. श्रीपाद गोविंद फणसळकर B. A., व. सरकारमान्य ऑडिटर्स मे. जी. डी. आपटे आणि कंपनी, यांनीं प्रतिवर्षाप्रमाणेंच याही वर्षी परिसंस्थेचे आर्थिक व्यवहार विनामूल्य व काळजीपूर्वक तपासून दिले. संस्थेवरील त्यांच्या प्रेमाचेंच हें एक प्रतीक आहे. याशिवाय ज्या अनेक व्यक्ति आणि संस्था यांचें आम्हास साह्य झालें त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून हे निवेदन संपवितो.

आपले

पुणें, ३ नोव्हेंबर १९६८

**मो. ना. गोखले**
**वि. वि. मोडक**

वृत्तान्त व समाव्यय स्वीकृत करावा
सूचक – प्रा. द. वि. बडवे
अनुमोदक – श्री हे. व्यं. बलकुंद्री
गो. रा. परांजपे
अध्यक्ष १८.११.६८

# ज्योतिर्विद्या परिसंस्था. १९६८–६९ चा निकल्प

**आय**

| १९६७–६८ चे प्रत्यक्ष रु. पै. | | १९६८–६९ मध्यें अपेक्षित रु. पै. |
|---|---|---|
| २६९–०० | वर्गणी | ४००–०० |
| ११७०–०० | देणग्या व अनुदान | ३,०००–०० |
| २२०–२१ | व्याज | २५०–०० |
| १९७–३७ | प्रकाशनांची विक्री | २५०–०० |
| | | ३,९००–०० |
| | अंदाजे तूट | ३,६००–०० |
| | | ७,५००–०० |

( संस्थेच्या संशोधन व इतर कायमनिधीतून * ही खूण केलेल्या बाबींसाठीं सुरवातीस खर्च करून या योजलेल्या कार्यासाठीं अधिक सद:स्य वर्गणी, देणग्या अनुदान मिळवून ही तूट भरून काढावी. )

**व्यय**

| १९६७ चा प्रत्यक्ष रु. पै. | | १९६८–६९ मध्यें अपेक्षित रु. पै. |
|---|---|---|
| २५४–९४ | वेतन, विशेष वेतन | ३६०–०० |
| १३१–५० | ग्रंथ संग्रह | ३००–०० |
| ३८७–५६ | व्याख्यानें, व्याख्यानमाला, प्रदर्शनें, अभ्यास मंडळ, खगोल निदर्शनें. | १,०००–०० * |
| | रौप्यमहोत्सव समारंभ | १,६००–०० * |
| ३०७–७६ | कचेरी खर्च | ७४०–०० * |
| ३१५–०० | जागा भाडें | ३२०–०० |
| ३१–८० | साधन संभार | १,०००–०० * |
| | फर्निचर व तत्सम अन्य उपयुक्त पदार्थ | १८०–०० |
| | प्रकाशनांची छपाई | २,०००–०० * |
| | | ७,५००–०० |

(२)

श्री. निकायसभेने निकल्प सर्वानुमते सम्मत केला. गो. रा. परांजपे
सूचना: ह. व्यं. बर्वे
अनुमोदन: रा. रा. पांगारकर.
१७-११-६८. अध्यक्ष

## JYOTIRVIDYA PARISANSTHA

Receipts and Payments accounts for the year ending on 30-6-68

| Receipts | | Rs. Ps. |
|---|---|---|
| **1. Subscription** | | |
| a) Ordinary Members | | 269–00 |
| **2. Donations** | | |
| a) Jubilee Fund | 98–00 | |
| b) Space Lectures | 252–00 | |
| c) Foundation Fund ✝ | 28–00 | |
| d) Petty donations ✝ | 13–00 | 391–00 |
| (✝ Presently, included in Bldg & Equipment Fund) | | |
| **3. Grant in aid** | | |
| (i) Govt | 284–00 | |
| (ii) Municipal Corp. | 500–00 | 784–00 |
| **4. Sale of Books** | | 197–37 |
| **5. Interest Of Bank Deposits** | | 220–29 |
| Opening Balance As on 1-7-67 | | |
| Cash in hand | 90–17 | |
| Cash in bank | 5,783–14 | 5,873–31 |
| | | 7,734–97 |

| Payments | | Rs. Ps. |
|---|---|---|
| 1. LIBRARY | | 131–50 |
| 2. DEAD STOCK & FURNITURE | | 8–00 |
| 3. MISC. EXPENDITURE ON OBJECT Study Circle, Films on Scientific Topics, exhibition, lectures etc | | 387–56 |
| 4. ESTABLISHMENT EXPENSES | | |
| a) Salary | 254–94 | |
| b) Rent | 315–00 | |
| c) Stationery | 72–47 | |
| d) Contingencies | 199–30 | |
| e) Postage | 35–05 | 876–76 |
| 5. EQUIPMENT | | 31–80 |
| CLOSING BALANCE AS ON 30-6-68 | | |
| Cash in hand | 327–79 | |
| Cash in Bank | 5,971–56 | 6,299–35 |
| | | 7,734–97 |

(३)

Sd./—S. G. Phansalkar,
INTERNAL AUDITOR

G. D. APTE & Co.
Chartered Accountants

Schedule IX
vide Rule 17 (1)
Registered No. F-44

Phone : 57872
United Western Bank Bldg.
Laxmi Road, Poona-2
Dated : 30th sept. 1968

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Income and Expenditure Account for the year ending 30th June, 1968

| EXPENDITURE | | Rs. Ps. | INCOME | | Rs. Ps. |
|---|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses : | | | By Interest on Bank A/c | | 220-29 |
| Salary | 254-94 | | By Donations | | 391-00 |
| Rent | 315-00 | | By Subscriptions | | 269-00 |
| Stationery | 72-47 | | By Sale of Books | | 197-37 |
| Contingencies | 199-30 | | By Grant-In-Aid | | |
| Postage | 35-05 | 876-76 | Govt. of | | |
| To Expenditure on Object of | | | Maharashtra | | |
| the Trust : Educational : | | | State | 284-00 | |
| Study Circle, Exhibition | | | Poona M. Corp. | 500-00 | 784-00 |
| Films, lectures, | | | By Deficit carried | | |
| etc. | 387-56 | | over to B/S | | 243-14 |
| Cost of Books | | | | | |
| Sold | 75-37 | 462-93 | | | |
| To Jubilee Fund | | 98-00 | | | |
| To Research Fund | | 500-00 | | | |
| To Building & Equipment Fund | | 41-00 | | | |
| To Depreciation— | | | | | |
| Library Books | 58-92 | | | | |
| Equipment | 10-35 | | | | |
| Furniture & | | | | | |
| Dead Stock | 56-84 | 126-11 | | | |
| Total Rs. | | 2,104-80 | Total Rs. | | 2,104-80 |

Dated at Poona : 30th Sept. 1968

Trustees : Sd/- M. N. Gokhale
(Secretary)
Sd/- S. V. Apte

As per our report of even date,

Sd/- G. D. Apte & Co.,
Chartereed Accountants,
Auditors.



G. D. APTE & Co.
Chartered Accountants

Schedule VIII
vide Rule 17 ( 1 ) : Date 30th Sept. 1968

Name of the Public Trust : JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA

Balance Sheet as at 30th June, 1968

| FUNDS & LIABILITIES | | Rs. Ps. | ASSETS | | Rs. Ps, |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus | | 1,983-25 | Library Books | | |
| Research Reserve | | | As per last B/S | 457-67 | |
| Fund | | | Additions during | | |
| As per last B/S 2,000-00 | | | the year | 131-50 | |
| Additions during | | | | 589-17 | |
| the year | 500-00 | 2,500-00 | Less Depreciation | | |
| Permanent Fund | | 100-00 | 10% | 58-92 | 530-25 |
| Building and | | | Furniture & | | |
| Equipment Fund | | 632-00 | Deadstock | | |
| Jubilee Fund | | 98-00 | As per last B/S | 560-41 | |
| Rent | | 25-00 | Additions during | | |
| Income & | | | the year | 8-00 | |
| Expenditure A/C | | | | 568-41 | |
| As per last B/S 4,739-72 | | | Less Depreciation | | |
| Less Deficit | 243-14 | 4,496-58 | 10% | 56-84 | 511-57 |
| | | | Equipment | | |
| | | | As Per last B/S | 71-55 | |
| | | | Additions in yr. | 31-80 | |
| | | | | 103-35 | |
| | | | Less Depreciation | | |
| | | | 10% | 10-35 | 93-00 |
| | | | Stock of publications | | |
| | | | (Books) | | 2,400-66 |
| | | | Cash & Bank Balance | | |
| | | | Cosmos Co-op. Urban Bk | | 5,971-56 |
| | | | Ltd in S/B A/C | | |
| | | | With (Secretary) | | |
| | | | Trustees | | 327-79 |
| Total Rs. | | 9,834-83 | | | 9,834-8 |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds Liabilities and of the Property and Assets of the Trust.

Dated at Poona 30th Sept. 1968

Trustees : Sd/-M. N. Gokhale (Secy.)
Sd/-S. V. Apte (Treasurer)

As per our report of even date.
Sd/-G. D. Apte & Co.,
Chartered Acctts, Aud ors

G. D. Apte & Co.
Chartered Accountants

With the Assistant Charity Commissioner, Poona
In the matter of Act XXIX of 1950
and
In the matter of

JYOTIRVIDYA PARISANSTHA, POONA.

Public Trust
Public Trust No. F-44
Audit for the year ending 30th June 1968

We, the undersigned Auditors, hereby report that :

(a) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules;
(b) The receipts and disbursements are properly and corrcetly shown in the accounts;
(c) The vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;
(d) The books, deeds, accounts, vouchers or other documents or record required by us were produced before us;
(e) Inventory certified by the trustee of the moveables of the public trust has not / has been maintained;
(f) The manager or trustee appeared before us and furnished the necessary information required by us;
(g) The property or funds of the trust were not applied for any object or purpose other than the object or purpose of the trust;
(h) The amounts of outstandings for more than one year are Rs. NIL and the amounts written off are Rs. NIL.
(i) Tenders were/were not invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000=00. Not applicable.
(j) Any money of the public trust has not been invested contrary to the provisions of Sec. 35;
(k) Alinations of the immovable property contrary to the provisions of Sec. 36 have not come to our notice.

United Western Bank Building
Laxmi Road, Poona 2
30th Sept. 1968

Sd/- G. D. APTE & CO.
Chartered Accountants



G. D. Apte & Co.
Chartered Accountants

**Schedule IX C** ( vide rule 32 )
Poona 2, 30th Sept 1968.

**Statement of income liable to contribution for the year ending 30th June 1968**

Name and registered No. of Public Trust

**Jyotirvidya Parisanstha, Poona. F-44**

| | Rs. Ps. |
|---|---|
| Gross annual income | 1,861-66 |
| Details of income not chargeable to contribution under Section 58 and Rule 32 : | The institution is a Public Trust exclusively for advancement and Propagation of secular education and hence its income is not liable to contribution as per Rule 31 ( 1 ) (a) of the Bombay Public Trusts Rules. |
| Deduction on account of repairs in respect of buildings not rented and yielding no income at 8⅓ per cent of the estimated gross annual rent | |
| Income liable to contribution Rs. | NIL |

Dated at Poona 30th Sept. 1968

Trustees-

Sd. M. N. Gokhale
( Secretary )

Sd. S. V. Apte,
( Treasurer )

Sd. G. D. Apte & Co.
Chartered Accountants

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

## उपयुक्त व संग्राह्य

( १ ) **सूर्यकुल**–( संग्राहक : प्रा. गो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे ) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु इ. संबंधानें ज्ञान-संवर्धक, अद्यावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा, विद्वानांनीं एकमुखानें वाखाणलेलें व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेनें ( डेकन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें ) पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठसंख्या २८०, किंमत रु. ५

*　　*　　*　　*

( २ ) **तारकानगरी**–तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्बोधक माहिती. तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गति कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याहि प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ३ रु.

*　　*　　*　　*

( ३ ) **ताराचित्रक संच**–( आवृत्ति दुसरी, दोन रंगांत छपाई ) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेच तारीखवेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसू शकेल त्याचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार : अनुक्रमें ४०×३० व २७×२२।। इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाहि मिळते. सर्व संचाची किंमत रु. १·५०.

*　　*　　*　　*

( ४ ) **वेधसाधनें व वेधशाळा**–प्राचीन काळापासून वेध घेण्याचीं साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणती पुढे कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवहज्योतिष्यक ( Radio Astronomy ) या विषयांची माहिती या ग्रंथांत सुबोध रीतीनें दिली आहे. किंमत रु. २.७५.

*　　*　　*　　*

( ५ ) **चंद्रप्रभा**–चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख, चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती, ओहोटी वगैरे



संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३० किंमत रु. २.५०.

*　　*　　*　　*

( ६ ) **विश्वाची रचना व उत्क्रांतिः**—( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभ्रिका, दीर्घिका, काय आहेत व या विश्वाची उत्क्रांति कशी होत आहे, यासंबंधीं सोपपत्तिक माहिती. पृष्ठे ४५, किंमत रु. ०·७५.

*　　*　　*　　*

( ७ ) **संज्ञावली**—ज्योतिष्यकशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचे अर्थ व विवरण. पृष्ठें २३. किंमत रु. ०·२५.

*　　*　　*　　*

( ८ ) **छोट्या पुस्तिका व प्रकाशनें; निबंध**—( १ ) **कालमापन व त्याचीं साधनें** ( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) काल म्हणजे काय, त्याचें मापन इ. खुलासा ( २ ) **पाश्चात्त्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहास**—( ले. कै. त्र्यं. गो. ढवळे ) ख्रिस्तपूर्व दीड हजार वर्षांपासूनच्या पाश्चात्त्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल यांची माहिती. ( ३ ) **सूर्याचें अंतरंग**—( लेखक : प्रा. दा. गो. ढवळे ) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. ( ४ ) **सूर्यदेवता**—( लेखक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय ) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख. ( ५ ) **आर्यांच्या मूळ वसतिस्थानासंबंधीं झालेल्या व्याख्यानमालेंतील मुद्द्यांचें टांचण.** वरील सर्व छोट्या पुस्तकांची किंमत प्रत्येकी रु. ०·१२.

*　　*　　*　　*

**टीप**—१. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठवली जात नाहींत. २. टपाल हशिलासह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें शाळा–कॉलेजांना व ग्रंथसंग्राहालयांकरितां उपयुक्त आहेत.

*　　*　　*　　*

**मागणी**—( १ ) **मो. ना. गोखले,** कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, चंद्रकिरण, ११९५ सदाशिव, पुणें २, या पत्त्यावर;

अथवा

( २ ) इन्टर नॅशनल बुकसर्व्हिस, पुणें ४ या पत्त्यावर करावी.

प्रकाशक : मो. ना. गोखले, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, चंद्रकिरण, ११९५ सदाशिव, पुणें.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे २.